# अनंत सूर्य

१ मे, २०१८

आत्मीय वाचकांनो,

एकशे दहा वर्षांपूर्वी याच महिन्यात, भारताच्या कर्नाटकातील तटवर्तीय प्रदेशात, बाबा मुक्तानंद यांनी या धरतीवर जन्म घेतला. आणि त्यांच्या जन्मासह, अशा हजारो संभावनांचा जन्म झाला ज्या आजपर्यंत अज्ञात आहेत; अनंत सूर्यांचा जन्म झाला जे पुढे जाऊन बाबांच्या उपस्थितीमुळे आणखी अधिक प्रखरतेने झगमगणार होते. बाबांच्या उपस्थितीमुळे अवघ्या विश्वभरामध्ये एका सार्वभौमिक संघम्‌चा जन्म झाला — हा संघम् अशा साधकांचा एक समुदाय होता जे ज्ञानाच्या, *खऱ्या* ज्ञानाच्या शोधात होते आणि ते ज्ञान ना केवळ त्या साधकांच्या जीवनात एक श्रेयस्कर बदल घडवून आणणार होते, तर ते ज्ञान त्या सर्वांच्या जीवनालादेखील समृद्ध करणार होते जे या साधकांच्या संपर्कात येतील. बाबा मुक्तानंदांची कृपा, त्यांच्या शिकवणी, त्यांची साक्षात् उपस्थितीच या ग्रहासाठी एक वरदान ठरली आणि त्या सर्वांची फळे आजही पाहायला मिळतात.

ज्ञानेश्वर महाराजांनी त्यांचे श्रीगुरु, निवृत्तीनाथ यांच्या स्तुतीपर एक सुंदर ओवी लिहिली आहे, जी मला याक्षणी स्मरते आहे. ही ओवी तोच भाव अतिशय सुंदरपणे व्यक्त करते, जो निश्चितपणे ते सर्व लोक अनुभवतात जे बाबांवर प्रेम करतात आणि बाबांनी या विश्वाला जे काही दिले आहे, त्याच्या केवळ विचारानेच भारावून जातात. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

> श्रीगुरूंना, त्या चित्‌सूर्याला, मी पुन्हापुन्हा नमन करतो.
> त्यांची स्तुती करू शकतील असे शब्दच नाहीत.[१]

जसजसे आपण बाबांच्या सौर जन्मदिनाकडे, १६मेच्या दिशेने जात आहोत, त्यांच्या चांद्र जन्मदिवसाचा पूर्ण चंद्र असा दिसतो आहे की जणू काही तो तिथेच थांबून राहिला आहे; त्याने आत्ताच आकाशाच्या त्या मखमली दुलईच्या मागे पुन्हा दडायला सुरुवातच केली आहे, जिच्यातून तो हळूहळू बाहेर आला होता. बाबांच्या जन्माचे माहात्म्य शब्दांमध्ये व्यक्त करणे खरोखरच अवघड आहे. बाबा एक शक्तिपात गुरू होते; त्यांच्या करूणेने आणि कृपेने असंख्य लाकांना शक्तिपात दीक्षा प्राप्त झाली. त्याच्या फलस्वरूप त्या लोकांनी आपल्या अंतरंगामध्ये ती अनुभुती घेतली, जी यापूर्वी त्यांच्यासाठी केवळ

एक कल्पना किंवा भूतकाळात हरवून गेलेली स्मृती असेल. त्यांनी ईश्वराचा अनुभव घेतला; त्यांनी अशा सर्वव्यापी, अशा वास्तविक प्रेमाचा अनुभव घेतला की, ज्याचे वर्णन करण्यासाठी 'अहेतुक' हा शब्ददेखील कमी पडेल.

आणि, बाबा सत्संगात असोत किंवा अनौपचारिक संभाषण करत असोत, आश्रमात असोत किंवा मग दौऱ्याच्या ठिकाणी, त्यांनी रात्रंदिवस साधकांना हे शिकवले की, कसा त्यांनी पुन्हापुन्हा खऱ्या आत्म्याचा अनुभव घेतला. बाबांनी त्या लोकांना ध्यान करावयास शिकवले; हे शिकवले की, त्यांच्या आत्म्याच्या शांतीचा निवास कुठे आहे याचा शोध त्या लोकांनी स्वतःच घ्यावा. त्यांनी लोकांना त्या शांतीसमवेत असा संबंध प्रस्थापित करण्यास शिकवले जो उत्तरोत्तर वाढत जाईल, त्याला खोली प्राप्त होईल. यामुळे पुढे जाता निश्चितच त्या लोकांच्या ध्यानाच्या व सिद्धयोगाच्या शिकवणींच्या अभ्यासाने प्राप्त फळांचे तरंग इतरांपर्यंत पसरले असते ज्याच्या परिणामस्वरूप त्या साधकांसाठी त्या फळांमध्ये आणखी वाढ झाली असती तसेच त्यांच्या पुण्यांमध्ये अधिकाधिक वाढ झाली असती. अतः हे एक पुण्य चक्र होते ज्याचा आरंभ बाबांनी केला; आणि त्यामुळे साधुतेचा निरंतर प्रसार होत गेला आणि त्याला दृढता प्राप्त होत गेली. अशी थोरवी होती बाबांच्या 'ध्यान क्रांतीची'!

मी बाबांचे दर्शन प्रत्यक्षात जरी घेतलेले नाही, तरीदेखील मला नेहमी असे वाटते की, मी *निश्चितच* त्यांना जाणते, मी त्यांना कायमच जाणते आहे. मला असे वाटते की जे लोक मनापासून बाबांना जाणू इच्छितात आणि स्मरणात ठेवू इच्छितात ते वस्तुतः बाबांना जाणू शकतात आणि त्यांना स्मरणात ठेवू शकतात. काही वर्षांपूर्वी मी येवल्याला भेट दिली होती, जे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक छोटेसे गाव आहे. बाबांनी अनेक वर्षे तिथे साधना केली. जेव्हा मी तेथील अरूंद रस्त्यांवरून चालत जात होते, तेव्हा प्रत्येक गोष्ट तिसऱ्या प्रहरीच्या सूर्याच्या सोनेरी प्रभावळीने सुस्नात होती, मला आठवते, त्यावेळी मला असे जाणवले होते की, बाबा तिथे *खरोखर आहेत.* ती जाणीव जितकी सहज, स्वाभाविक होती तितकीच ती रोमांचकारी आणि अनोखी होती. बाबा तेथील सुगंधित हवेत होते आणि अस्ताला जाणाऱ्या सूर्यातदेखील; ते स्वच्छ, निर्मळ निळ्या आकाशातही होते आणि त्या मखमली आनंदामध्येही जो माझ्या हृदयात प्रसरित होत होता. आजदेखील, जेव्हा मी येवल्यापासून अनेक मैल दूर आहे, तेव्हा मला ते क्षण अतिशय स्पष्टपणे आठवत आहेत. मी जेव्हा बाबांच्या गोष्टी वाचते किंवा ऐकते, उदाहरणार्थ, मी जेव्हा त्यांच्या शिकवणींचा अभ्यास करते, मी जेव्हा त्यांच्या नामाचे संकीर्तन करते किंवा त्यांच्या जीवनाविषयी किंवा त्यांनी प्रदान केलेल्या वारशाविषयी मनन करते, तेव्हा माझ्या मनःपटलावर आणि हृदयावर उमटलेल्या त्यांच्या स्मृतींची छाप विनासायास जिवंत होते.

मागील महिन्यातील पत्रात, मी लिहिले होते की गुरुमाईंचा २०१८साठी असलेला संदेश — 'सत्संग'चा अभ्यास करत असताना बाबांच्या उपस्थितीचा उत्सव साजरा करणे ही कशी विशेष आणि अद्‌भुत अशी बाब आहे. सत्संग हे त्या सत्याचे सान्निध्य आहे जे स्वाभाविकपणे आपल्या अंतरात विद्यमान आहे आणि ज्याला आपल्या अस्तित्वापासून वेगळे करता येत नाही; ते सतत आपल्यासाठी सहज उपलब्ध आहे, मग आपण कोणीही का असेना, कुठूनही का आलेलो असेनात, कसेही दिसत असलो तरीही किंवा आपली श्रद्धा कोणत्याही गोष्टीवर असली, तरीही. गुरुमाईंनी वर्ष २०१८च्या आपल्या संदेश प्रवचनात जे समजावून सांगितले, ते *तंतोतंत* तेच आहे जे बाबांनी शिकवले, अगदी तसेच, जसे बाबांच्या आधी होऊन गेलेल्या महान संतकवींनी शिकवले होते. बाबांचे जगणे असेच होते. हेच ते आहे जे बाबांनी जगाला दिले.

बाबांचा आपल्या सर्वांवर केवढा विश्वास होता; त्यांना विश्वास होता सत्याला जाणून घेण्याच्या आपल्या क्षमतेवर जो आपला जन्मसिद्ध अधिकार आहे, आणि त्यांच्या शिकवणी आपल्याला प्रेरित करतात, शिवाय *आग्रह धरतात* की आपणही स्वतःमध्ये त्याच विश्वासाला विकसित करावे. आपल्याकडे बाबांचा महिना आहे — एका सुसंधीच्या रूपात, एका प्रेरणास्त्रोताच्या, एका प्रोत्साहनाच्या रूपात. तेव्हा, या महिन्यात आपण सत्संगाचा अभ्यास करण्यासाठी आणखी अधिक दृढतेने आणि निरंतरतेने स्वप्रयत्न जेव्हा करत आहोत, तेव्हा या गोष्टीवर सजगतेने विचार करणे उपयुक्त ठरेल की आणखी अधिक विश्वासासह व श्रद्धेसह सत्संगाचा अभ्यास आपणास कसा करता येईल. शेवटी, निरंतर प्रयत्नाचा ताणाबाणा विश्वासाच्या, श्रद्धेच्या धाग्यांनी विणलेला असतो. पुढचा मार्ग भलेही साधा-सरळ नसेल, तरीदेखील विश्वासच आपल्याला पुढे जात राहण्याला साहाय्य करत असतो; आपण अंतरात ज्याचा शोध घेत होतो त्याला पाहून काही काळ उलटून गेलेला असला, तरीही तो विश्वासच असतो जो वारंवार आपल्याला अंतराकडे वळवतो.

आणि विश्वास हा काही केवळ आव्हानात्मक किंवा अनिश्चिततेच्या वेळी आपल्याला आधार देणारे साधन नाही. जेव्हा सर्व काही ठीक चाललेले असते, जेव्हा आपण स्वतःच्या अंतरंगाशी जोडले गेलेले असल्याचे अनुभवत असतो तेव्हादेखील, आणि त्या वेळी विशेषत्वाने, विश्वास आपल्याला पुढे जाण्याची प्रेरणा देतो. विश्वास आपल्याला याची दृढ प्रतीती करवून देतो की, आपल्या आंतरिक अनुभवात पुढे *आणखीही* काही आहे, की आपल्या अंतरात *आणखी अधिक* भगवंताचे प्रेम आहे ज्याचा शोध आपल्याला घ्यायचा आहे आणि ते इतरांना द्यायचे आहे. आणि विश्वास आपल्याला या निश्चिततेच्या भावनेने भरून टाकतो की आपण त्या प्रेमाला शोधू शकतो, आणि निश्चितच शोधून काढू.

तर मग, तुमचा स्वतःवर जो विश्वास आहे त्याला तुम्ही मजबूत कसे कराल? विशेषतः तेव्हा, जेव्हा विश्वासदेखील स्वतः परम सत्याप्रमाणेच अत्यंत सूक्ष्म आणि तरल असू शकतो.

एक मार्ग आहे, क्षणभर थांबून मागे वळून पाहाणे, तेव्हादेखील, जेव्हा तुम्ही तुमच्या यात्रेत पुढे जाण्याची योजना तयार करत असाल. वर्ष २०१८च्या पाचव्या महिन्यात तुम्ही प्रवेश करत आहात आणि त्याबरोबरच नववर्ष संदेशाच्या तुमच्या अभ्यासाच्या पाचव्या महिन्यातदेखील. शक्य आहे की आता तुमची समज, तुमचा अनुभव व सत्य यांच्यासमवेत असलेला तुमचा संबंध तसा नसेल, जसा तो जानेवारी महिन्यात होता. तुम्ही निश्चितच प्रगती केली असेल. त्याची अभिस्वीकृती करणे अर्थात् त्याला मान्यता देणे फार महत्त्वाचे आहे. भलेही त्यावेळी तुम्हाला हे दिसले नसेल, जेव्हा तुम्ही सुरुवात केली होती, तरीदेखील जेव्हा तुम्ही याकडे पाहाता की तुम्ही कुठवर पोहोचला आहात आणि कशा प्रकारे तुम्ही घेतलेल्या प्रत्येक पावलाने तुम्हाला एका अर्थपूर्ण स्थानापर्यंत पोहोचण्यास मदत केली आहे, तेव्हा तुमच्या हे लक्षात येते : “अरे वा! मी *नक्कीच* हे करू शकतो. मी इतक्या लांब तर आलोच आहे. याहीपेक्षा आणखी पुढे मी जाऊ शकतो.”

याशिवाय आतापर्यंत स्वतःला आलेल्या काही अनुभवांचेदेखील स्मरण तुम्ही करू शकता, सत्याची जी ओझरती दर्शने तुम्हाला झाली असतील भलेही ती कितीही सूक्ष्म किंवा विलक्षण का असेनात त्यांचेदेखील तुम्ही स्मरण करू शकता. हे अनुभव याचे प्रमाण आहेत की तुम्ही प्रयत्न केले आहेत. ते तुम्हाला विश्वासाचा, श्रद्धेचा विकास करायला मदत करतात. ते अनुभव तुम्हाला हळूच तुमच्या कानात सांगतात की तुम्ही पुढे जात राहावे, याच दिशेने पुढे जात राहावे आणि हे शोधून काढावे की भविष्यात आणखी काय-काय येणार आहे.

आणि जर काही कारणामुळे तुम्हाला असे वाटले की, तुम्ही स्वतःच्या प्रगतीला ओळखू शकत नाही किंवा तुम्हाला आतापर्यंत असा एखादा अनुभव आलेला नाही ज्यासाठी तुम्हाला प्रेरणा मिळेल, तर काहीच हरकत नाही. तुम्ही नेहमीच अभ्यासांमधून विश्वास आणि श्रद्धा यांना साध्य करू शकता. तुमच्याकडे दोन प्रकारचे अभ्यास आहेत, नामसंकीर्तन, ध्यान व जप यासारखे मूलभूत अभ्यासदेखील आहेत आणि सत्संगाचा अभ्यास करण्याच्या तुमच्या स्वतःच्या पद्धतीसुद्धा आहेत. बाबांचे पुस्तक *From the Finite to the Infinite* [फ्रॉम द फाइनाइट टू दी इन्फिनिट] मधील एक उतारा मला खूप आवडतो. हे एक भक्त आणि बाबा यांच्यातील संभाषण आहे. भक्ताने बाबांना विचारले की जर त्याच्यात श्रद्ध आणि विश्वास नसेल, तर त्यामुळे ध्यानात तो आत्म्याशी जोडला जाणार नाही का. बाबांनी उत्तर दिले, “ध्यान करत राहा, श्रद्धा बसेल, विश्वास येईल.”[२]

अतः आपण पुन्हा पुण्य चक्राच्या संकल्पनेवर परत येतो. विश्वास आणि प्रयत्न एकमेकांना दृढ बनवतात. तुम्ही स्वतःच्या आत्म्याशी जोडले जाण्याचा, अंतरात निहित सत्याशी सत्संग करण्याचा जितका अधिक प्रयत्न कराल, तितकाच तुमचा विश्वास अधिक प्रबळ होत जाईल. आणि तुमचा विश्वास जितका अधिक प्रबळ होत जाईल, तितक्याच अधिक स्वाभाविक, सहज आणि अनवरत रूपाने तुम्ही सत्संग कराल. हा असा सिद्धान्त आहे ज्याच्या साधेपणातच त्याची सुंदरता आहे. होय, जर तुम्हाला तुमच्या आत्म्याच्या संपर्कात सतत जोडलेले राहण्याच्या मार्गावर पुढे जायचे असेल, तर विश्वास असायलाच हवा. तरीदेखील ही एखादी पूर्वअट किंवा अपेक्षा नाही, ही अशी एखादी बाब नाही की स्वतःच्या आत्म्याशी जोडले जाण्याचा प्रयत्न करण्याआधी तुमच्या अंतरात विश्वासाचा पूर्णपणे विकास व्हायलाच हवा. याऐवजी, विश्वास आणि प्रयत्न, यांचा सर्वांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे. ते एकत्र मिळून कार्य करतात आणि आपल्या अंतरात विकसित होऊन, आपल्या समक्ष स्वतःलाच प्रकट करतात; ते बाबांच्या या शाश्वत शब्दांमध्ये निहित सत्य आपल्या नेत्रांसमोर उजागर करतात, “तुमचा राम तुमच्या अंतरी तुमच्याच स्वरूपात वास करतो.”

या महिन्यादरम्यान सिद्धयोग बेबसाईटवर अशा अनेक गोष्टी असतील ज्या बाबांचा सन्मान करण्यासाठी व त्यांचा जन्मदिवस साजरा करण्यासाठी मदत करतील आणि त्याबरोबरच गुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या आपल्या अभ्यासाला पुढे नेण्यासदेखील तुमच्यासाठी साहाय्यक ठरतील. बाबांच्या जन्मदिवस महोत्सवाप्रित्यर्थ आयोजित होणाऱ्या सिद्धयोग ऑडिओ सत्संगाचे पंजीकरण तुम्ही जर अद्याप केले नसेल, तर ते करण्यास मी तुम्हाला आमंत्रित करते. या सत्संगाचे शीर्षक आहे, “उसे देखो जो सबमें रहता है,” — जे ‘सत्संग’च्या ‘सत्’च्या संदर्भात आहे, त्या सत्याच्या संदर्भात आहे जे या विश्वब्रह्मांडाच्या समस्त विविध रूपांना आणि आकारांना एक करते.

या व्यतिरिक्त, तुम्ही वेबसाईटवर बाबांविषयी आणखी काही गोष्टी वाचाल. कदाचित या गोष्टी वाचता-वाचता तुम्हाला बाबांसमवेत घडलेले *तुमचे स्वतःचे* काही प्रसंग आठवतील — बाबांकडून प्रत्यक्षात, ध्यानात किंवा स्वप्नात तुम्हाला मिळालेल्या शिकवणींच्या स्मृती जाग्या होतील. जसजश्या या गोष्टी तुम्हाला आठवत जातील, त्या लिहून वेबसाईटकडे अवश्य पाठवा [यासाठी वेबसाईटवर एक लिंक दिली गेली आहे]

मे महिन्यात अमेरीकेत व भारतात तसेच विश्वातील इतर अनेक भागांमध्ये मातृदिनदेखील [ Mother’s Day] साजरा केला जातो. सिद्धयोग मार्गावर गुरुमाई व बाबा आपल्याला शिकवतात की आपण दिव्य माता, महाकुंडलिनी शक्तीची पूजा करावी, जिची शक्ती साधकाच्या आत शक्तिपात दीक्षेद्वारे जागृत

होते. गुरुजन आपल्याला हेदेखील शिकवतात की आपण त्या सर्व मातांप्रति आपला आदर अर्पण करावा ज्यांचे ममतापूर्ण कृत्य शुद्धतम प्रेमाचे प्रमाण आहे; त्यांच्या कृत्यांमधून जे प्रदर्शित होते ते वस्तुतः सद्गुणांचे प्रकट रूप आहे. या वर्षी मातृदिन मे महिन्याच्या १३ तारखेला आहे, तेव्हा इतके म्हणणेच पुरेसे ठरावे की त्या वेळी वेबसाईट जरूर पाहा!

तर, पुढील काही दिवसांमध्ये बरेच काही अपेक्षित आहे — वेबसाईटवरही आणि आपल्या साधनेमध्येदेखील. मे महिन्याने स्वतःमध्ये किती संभावना, किती सामर्थ्ये धारण केलेली आहेत. किंवा कदाचित — त्या संभावना, ती सामर्थ्ये आपल्यातही असतील! आणि हा ऋतू जो विपुलतेने बहरलेला आहे, चंद्राच्या घटणाऱ्या कलेमध्ये आपल्याला आतादेखील बाबांचे स्मितहास्य जाणवते आहे आणि दिवसाचा सप्तरंगी प्रकाश जो आपल्या अंतरात बाबांच्या स्मृतींना जागे करतो, हे सर्व आपल्या अंतरातील त्या सामर्थ्याला, त्या संभावनांना थोडे आणखी प्रकट करतात.

माझ्या शुभेच्छा आहेत की, तुमच्यासाठी बाबांचा हा महिना झगमगणाऱ्या उल्हासाने व आनंदाने परिपूर्ण असो!

आदर सहित,

ईशा सरदेसाई

१ ज्ञानेश्वरी १६.१७। स्वामी कृपानंद द्वारा संपादित *Jnaneshwar's Gita: A Rendering of the Jnaneshwari* [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९९९] पृ. २५६।

२ *From the Finite to the Infinite,* द्वितीय आवृत्ती, [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९९४] पृ. ३३२।

© २०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन® सर्वाधिकार सुरक्षित.